**विंधन विहिरींचा कार्यक्रम**
**राबविण्यासाठी मार्गदर्शक सूचना**

अपमा ३ ८।१८

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
शासन परिपत्रक क्र. ग्रापापु १००३/प्रक्र१८/पापु-०७,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २७, फेब्रुवारी २००३

पहा :-- १) शासन परिपत्रक, पा.पु. व स्व.वि. क्र. ग्रापापु १००३/ प्र.क्र.४३६/पापु-०७, दिनांक २०.११.२००१

२) शासन परिपत्रक, पा.पु. व स्व.वि. क्र. ग्रापापु १००२/ प्र.क्र.५७४/पापु-०७, दिनांक ४.५.२००२

**परिपत्रक :--**

विंधन विहिरीच्या टंचाई अंतर्गत कार्यक्रमाचे सर्वेक्षण जिल्हा परिषदांनी त्यांच्याकडे असलेल्या भूवैज्ञानिकांकडून करुन घ्यावे, हे सर्वेक्षण जिल्हा परिषदांमधील उपलब्ध भूवैज्ञानिकांकडून विहित कालावधीत पूर्ण करुन घेणे शक्य नसल्याची संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची खात्री झाल्यास त्यांनी तसे तात्काळ संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना कळवून जिल्हाधिकाऱ्यांनी टंचाईच्या कार्यक्रमाची व्याप्ती / तिव्रता विचारात घेवून विंधन विहिरींच्या टंचाईच्या कामाच्या सर्वेक्षणासाठी जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालयातील भूवैज्ञानिकांच्या सेवा, वाहने व वाहनचालकांसह अधिग्रहित करुन जिल्हापरिषदांना उपलब्ध करुन देण्याच्या सूचना संदर्भीय क्र. १ येथील दिनांक २०.११.२००१ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत.

२. त्यानुसार राज्यातील जवळपास सर्वच जिल्हयांत विंधन विहिरींच्या टंचाई अंतर्गत कामाच्या सर्वेक्षणासाठी जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालयातील सर्वच्या सर्व भूवैज्ञानिकांच्या सेवा, वाहने व वाहनचालक यांच्यासह अधिग्रहित करुन जिल्हा परिषदांना उपलब्ध करुन देण्यात येत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेमार्फत राज्यस्तरावर राबविण्यात येत असलेल्या विविध कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत खंड पडत आहे.

३. या सर्व बाबींचा विचार करुन शासन आता अशा सूचना देत आहे की, जिल्हयातील विंधन विहिरींच्या टंचाई अंतर्गत कार्यक्रमाचे सर्वेक्षण जिल्हा परिषदेकडील उपलब्ध भूवैज्ञानिकांकडून करुन घेण्यात यावे. टंचाई कार्यक्रमाची व्याप्ती पहाता हे सर्वेक्षण जिल्हा परिषदांमधील उपलब्ध भूवैज्ञानिकांकडून विहित कालावधीत पूर्ण करुन घेणे शक्य नसल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची खात्री झाल्यास, त्यांनी जिल्हयामधील टंचाई अंतर्गत विंधण विहिरींचे सर्वेक्षणाचे उपलब्ध काम, हे काम विहित कालावधीत पूर्ण करुन घेण्यासाठी जिल्हा परिषदेकडे असलेल्या भूवैज्ञानिकां व्यतिरिक्त आवश्यक असलेल्या भूवैज्ञानिकांची संख्या इत्यादी बाबतचा प्रस्ताव संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवावा. संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी असा प्रस्ताव प्राप्त झाल्यावर त्यावर तात्काळ संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांचे अभिप्राय मागवून घ्यावेत. जिल्हाधिकाऱ्यांकडून असे अभिप्राय मागविण्यात आल्यानंतर ते दोन दिवसात जिल्हाधिकाऱ्यांना देण्याची दक्षता संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पूणे यांनी घ्यावी. संचालकांच्या सल्ल्यानुसारच जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालयातील भूवैज्ञानिकांच्या सेवा, वाहने व वाहनचालक यांच्यासह अधिग्रहीत करुन संबंधित जिल्हा परिषदेला उपलब्ध करुन देण्याबाबतचा निर्णय जिल्हाधिकाऱ्यांनी घ्यावा.

४. चालू वर्षी ( सन २००३ मध्ये ) टंचाई अंतर्गत विंधण विहिरींच्या सर्वेक्षणासाठी जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालयातील भूवैज्ञानिकांच्या सेवा या पूर्वीच जिल्हा परिषदांना उपलब्ध करुन देण्यात आल्या असतील तर, अशा जिल्हयातील टंचाई अंतर्गत विंधण विहिरींच्या कामाचा संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांनी आढावा घ्यावा व तेथे अधिग्रहीत केलेल्या किती भूवैज्ञानिकांच्या सेवा आवश्यक आहे हे तपासून तशी शिफारस संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना करावी, संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी संचालकांनी केलेल्या शिफारशीनुसार आवश्यक तेवढयाच भूवैज्ञानिकांच्या सेवा जिल्हा परिषदेस उपलब्ध करुन द्याव्यात. उर्वरीत भूवैज्ञानिकांना जिल्हा वरिष्ठ भूवेज्ञानिकांचे कार्यालयात परत पाठविण्यात यावे.

५. विंधन विहिरींचा कार्यक्रम प्रभाविपणे राबविण्यासाठी जिल्हा परिषदांमार्फत राबविण्यात येत असलेल्या विंधन विहिरींच्या कामापैकी सर्वेक्षणाच्या फक्त २% कामाची तपासणी प्रदेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांनी करण्यांच्या सूचना संदर्भिय क्र. २ येथील दिनांक ४ मे २००२ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. त्यामुळे प्रादेशिक उपसंचालकांनी विंधन विहिरीच्या कामापैकी फक्त सर्वेक्षणांच्या कामांची तपासणी करावी विंधन विहिरीच्या खोदाईचे काम पाहू नये असा अर्थ लावला जात असल्याचे संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पूणे यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे. त्यामुळे याबाबत शासन सूचना देत आहे, की विंधन विहिरींच्या व वायू संपिडक सुरुंग योजनेच्या विभागातील संपूर्ण कामाच्या तांत्रिक पर्यवेक्षणाची जबाबदारी प्रादेशिक उपसंचालक भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांची राहील.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.**

**( सुधीर ठाकरे )**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

विभागीय आयुक्त सर्व
जिल्हाधिकारी (सर्व)
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पूणे
जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
प्रादेशिक उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
मुख्य खोदन अभियंता, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, [redacted] पुणे
जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, (सर्व)
वरिष्ठ खोदन अभियंता, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, (सर्व)
उप अभियंता, पाणी पुरवठा उपविभाग, जिल्हा परिषद (सर्व)
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासन अधिकारी
निवडनस्ती, कार्यासन पापु-०७

D:\wso7\slburde\1003-cr-18.doc